# राम जन्मला गं सखे, राम जन्मला...

## आगरटाकळीत श्रीराम नवमी उत्सव; रामदास स्वामी जयंतीनिमित्त धार्मिक कार्यक्रम

**सकाळ वृत्तसेवा**



आगरटाकळी : समर्थ रामदास स्वामी मठात शुक्रवारी श्रीराम नवमीनिमित्त हनुमान मंदिराच्या गाभाऱ्यात सजविण्यात आलेला पाळणा.

उपनगर, ता. १५ : आगरटाकळी येथील मारुती देवस्थान आणि समर्थ रामदास स्वामी मठात रामनवमीचा उत्सव साजरा करण्यात आला. रामनवमीबरोबरच आज समर्थ रामदास जयंती असल्याने मठात विविध धार्मिक कार्यक्रम झाले. दुपारी बाराला रामजन्म झाल्यानंतर महिलांनी पाळणा गीते म्हटली. दासनवमीनिमित्त संपूर्ण मठ रोषणाईने सुशोभित करण्यात आला. दर्शन घेण्यासाठी भाविकांनी रांगा लावल्या.



सकाळपासून हनुमान मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रम झाले. महिलांनी रामनाम जप केला. गाभाऱ्यात पाळणा सजविण्यात आला. दुपारी रामाची मूर्ती पाळण्यात ठेवून रामजन्म उत्सव साजरा करण्यात आला. 'राम जन्मला गं सखे, राम जन्मला...' अशी पाळणा गीते सादर करण्यात आली. या वेळी समर्थांच्या पादुकांचे पूजनही करण्यात आले. प्रारंभी समर्थांच्या वस्तू काळाराम मंदिरात देवदर्शनासाठी सेवेकरी मंडळींनी नेल्या. त्यानंतर टाकळी संगम येथील पवित्र जलाद्वारे अभिषेक करून मंदिरात स्थापित करण्यात आल्या. हार व प्रसादाची दुकाने स्थानिक विक्रेत्यांतर्फे लावण्यात आली.

आजपासून २२ एप्रिलपर्यंत उत्सव सोहळा होणार असून, मान्यवरांची व्याख्याने होतील. उद्या (ता. १६) 'संत साहित्य आणि आपण' या विषयावर सदानंद मोरे, रविवारी (ता. १७) 'उत्कट तेची घ्यावे' या विषयावर यशवंत पाठक, सोमवारी (ता. १८) 'गुरूपरंपरा व नामाचे माहात्म्य' या विषयावर कॅप्टन अतुल इंदूरकर, मंगळवारी (ता. १९) 'जय जय रघुवीर समर्थ' या विषयावर सच्चिदानंद कानेटकर, बुधवारी (ता. २०) 'मानवी जीवनात धर्माची आवश्यकता' या विषयावर संजय गोडबोले, गुरुवारी (ता. २१) व शुक्रवारी (ता. २२) 'हनुमान चरित्र' या विषयावर ऋतुजा वाळिंबे यांचे व्याख्यान होईल. 'सकाळ'च्या उत्तर महाराष्ट्र आवृत्तीचे कार्यकारी संपादक श्रीमंत माने, ज्येष्ठ पत्रकार विश्वास देवकर, भालचंद्र पिंपळवाडकर, चंदूलाल शाह, सूर्यकांत रहाळकर, डॉ. राम कुलकर्णी, शैलेंद्र तनपुरे, डॉ. राजेंद्र मुळे, डॉ. विनायक गोविलकर प्रमुख पाहुणे असतील.

# सुखाचे रहस्य 'मनाचे श्लोका'त : पाठक

## आगरटाकळी : मारुती देवस्थान व्याख्यानमालेस प्रारंभ

**सकाळ वृत्तसेवा**



आगरटाकळी : मारुती देवस्थानात श्रीराम नवमी उत्सवानिमित्त शुक्रवारी झालेल्या व्याख्यानमालेत बोलताना प्रकाश पाठक. शेजारी एन. के. ब्रह्मे, के. एम. ढवळे, प्रकाश पवार, ज्योतिराव खैरनार, सुधीर शिरवाडकर आदी.

उपनगर, ता. १५ : भौतिक सुख आज माणसाच्या पायाशी लोळत आहे. तरी माणूस जगात सुखी नाही. याचे कारण लालसा वाढत जाणे होय. मनुष्य सुखाच्या पाठीमागे धावत असतो. या धावण्यामागे काय दडले आहे, हे त्याला समजत नाही. या सुखाचे रहस्य समर्थांनी मनाच्या श्लोकात सांगितले आहे. समाधानानेच ईश्वर प्राप्ती होते, असे प्रतिपादन हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीचे सहकार्यवाह प्रकाश पाठक यांनी केले.

आगरटाकळी येथील मारुती देवस्थान आणि समर्थ रामदासस्वामी मठात आजपासून रामनवमी उत्सवानिमित्त व्याख्यानमालेला सुरवात झाली. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायालयाचे प्रधान सचिव के. एम. ढवळे यांच्या हस्ते व्याख्यानमालेचे उद्घाटन करण्यात आले. जिल्हा व अतिरिक्त सत्र न्यायाधीश एन. के. ब्रह्मे, विश्वस्त सुधीर शिरवाडकर, ज्योतीराव खैरनार, ज्येष्ठ पत्रकार विश्वास देवकर, प्रकाश पवार, दिलीप कैचे, विजया माहेश्वरी उपस्थित होते. 'जगी सर्व सुखी असा कोण आहे' या विषयावर पाठक यांनी पुष्प गुंफले. समर्थांनी उभे आयुष्य समाजासाठी वाहिले. समाज विचाराने बांधला जावा, हे त्यांना अपेक्षित होते. समाज विचाराने प्रेरित होत नाही, तोपर्यंत बदल घडून येत नसतात. व्यक्तिमत्त्वाला आकार देण्यासाठी विचार व्हावा. कोणत्याही गोष्टीकडून जास्त अपेक्षा केली, तर दुःखच पदरी पडते. अपेक्षेला नियंत्रण करण्यासाठी केवळ तपश्चर्या हाच मार्ग असतो. प्रारंभी रत्नाकर अणे, सुरेश कुलकर्णी यांनी श्लोक सादर केले. ओंकार शौचे यांनी सूत्रसंचालन केले.